# दरमहा आयोजित करायच्या सामाजिक प्रबोधनपर कार्यक्रमांची यादी

**जानेवारी – राष्ट्रीय युवा दिवस (१२ जानेवारी)**

१. स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो, त्यांच्या तेजस्वी विचारांनी तरुणांचा आत्मविश्वास जागृत होतो व त्यांना कर्तव्याची जाणीव होते.

२. आजच्या पिढीने कर्मयोग, योगशक्ती आणि राष्ट्रसेवेचे आचरण करावे.

➤ स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर भाषण / वक्तृत्व स्पर्धा

➤ युवा नेतृत्व कार्यशाळा किंवा व्यक्तिमत्व विकास शिबीर

---

**फेब्रुवारी – राष्ट्रीय विज्ञान दिन (२८ फेब्रुवारी)**

१. शास्त्रज्ञ सी. व्ही. रमन यांनी 28 फेब्रुवारी 1928 रोजी रमन परिणामाचा शोध लावून विज्ञानाला नवी दिशा दिली — यासाठी 1930 मध्ये नोबेल पारितोषिक जिंकले .

२. हा दिवस तरुणांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा, नवकल्पना आणि देशाच्या विकासात विज्ञानाच्या भूमिकेची जाणीव वाढवतो.

➤ तांत्रिक प्रकल्प प्रदर्शन व आंतर-आयटीआय स्पर्धा

➤ विद्यार्थ्यांनी सादर केलेले थेट प्रात्यक्षिके किंवा प्रयोग

➤ समाजातील उद्योजकांची "इंडस्ट्रियल मीट" आयोजित करणे

---

**मार्च – सावित्रीबाई फुले स्मृती दिन (१० मार्च)**

१. भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका आणि सामाजिक सुधारक म्हणून सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी क्रांतिकारी लढा दिला.

२. स्त्रीशिक्षण व समाजपरिवर्तनाचे बीज पेरणारी प्रेरणादायी व्यक्तिमत्व.

➤ महिला सशक्तीकरण विषयक पोस्टर / चित्रकला स्पर्धा

➤ उत्कृष्ट महिला विद्यार्थिनींचा सत्कार

➤ निबंध स्पर्धा – 'बेटी बचाओ, देश बनाओ'

---

**एप्रिल – डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४ एप्रिल)**.

१. संविधानाचे शिल्पकार आणि सामाजिक समतेचा उद्‌घोष.

२. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा अभ्यास करून जबाबदार नागरिक बनावे.

➤ शिक्षण व कौशल्य विकास यावरील वादविवाद स्पर्धा

➤ आंबेडकर जीवनकार्यावर माहितीपट व चर्चा व रांगोळी स्पर्धा

➤ संविधान विषयक पुस्तक परिचय

---

**मे – पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती (३१ मे)**

१. मंदिरांचा जीर्णोद्धार व धर्मसंवर्धन करणारी आदर्श शासिका.

२. महिलांच्या नेतृत्वाचे प्रेरणास्थान म्हणून त्यांचा गौरव आवश्यक आहे.

➤ मंदिर हेरिटेज वॉक

➤ संस्कृती व महिला नेतृत्वावर आधारित नाटिका

➤ मंदिरकला विषयक रांगोळी / चित्र स्पर्धा

**जून – शिवराज्याभिषेक दिन** (**६ जून**)

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श राज्यकारभाराची आठवण.

२. संघटन, स्वाभिमान व धैर्याचे प्रतीक म्हणून शिवचरित्र प्रेरक ठरते.

➤ ‘पंच परिवर्तन’ विषयावर व्याख्यानमाला

➤ शिवरायांच्या राज्यकारभारावर व्याख्यान

➤ छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथांवर आधारित पोवाडा स्पर्धा आयोजित करणे

---

**जुलै – गुरु पौर्णिमा** (**१० जुलै**)

१. ज्ञान, संस्कार व मूल्यांची जडणघडण करणाऱ्या गुरूंचा सन्मान.

२. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस.

➤ गुरुवंदना सांस्कृतिक कार्यक्रम

➤ शिक्षकांचा 'गुरु सन्मान' म्हणून गौरव

---

**जुलै – विजय दिवस** (**२६ जुलै**)

१. विजय दिवस हा भारताच्या शौर्यपरंपरेचा गौरव करणारा दिवस आहे.

२. पुरू, सम्राट चंद्रगुप्त, राजा सुहेलदेव, महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून ते आधुनिक भारतातील पराक्रमी योद्ध्यांपर्यंत – या भूमीने नेहमीच परकीय आक्रमणांना समर्थपणे प्रत्युत्तर दिले.

➤ भारताच्या ऐतिहासिक वीरांचा परिचय कार्यक्रम

➤ स्वातंत्र्य लढ्यावरील पथनाट्य / भाषण स्पर्धा

---

**ऑगस्ट – विभाजन विभीषिका दिवस (१४ ऑगस्ट)**

१. देशाच्या विभाजनावर समर्पित स्मृतीदिन.
२. शांतता, सहिष्णुता व मानवतेचा संदेश तरुण पिढीपर्यंत पोचवणे गरजेचे.

➤ विभाजनावर भाषण / निबंध स्पर्धा
➤ शांती प्रतिज्ञा कार्यक्रम / मेणबत्ती मोर्चा
➤ विभाजनावर आधारित माहितीपट प्रदर्शन

---

**सप्टेंबर – अंत्योदय दिवस (२५ सप्टेंबर)**

१. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी राष्ट्राला जोडणारे आणि भारतीय संस्कृतीवर आधारित, संपूर्ण जगाला एकात्मतेने पाहणारे 'एकात्म मानवदर्शन' अशी ही शिकवण दिली.
२. समाजासाठी सेवा, समर्पण व अंतिम व्यक्तीच्या उत्थानाचा संदेश तरुणांनी आत्मसात करावा.

➤ समाजसेवा / रक्तदान शिबीर
➤ 'एकात्म मानवदर्शन' विषयक व्याख्यान
➤ 'अंतिम व्यक्ती'च्या सेवेसाठी विद्यार्थ्यांचे सादरीकरण

---

**ऑक्टोबर – राष्ट्रीय एकता दिवस (३१ ऑक्टोबर)**

१. सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे भारतातील 550 हून अधिक संस्थानिकांना एकत्र करून एकसंध राष्ट्राची निर्मिती केली.
२. राष्ट्र एकसंध ठेवण्यासाठी एकजुटीचा संदेश महत्त्वाचा आहे.

➤ एकता दौड / सायकल रॅली
➤ सरदार पटेलांच्या कार्यावर निबंध स्पर्धा

---

**नोव्हेंबर – संविधान दिन (२६ नोव्हेंबर)**

१. भारतीय संविधानाचा स्वीकार दिवस.

२. नागरिकांनी त्यांच्या हक्क व कर्तव्यांची जाणीव ठेवण्यासाठी आवश्यक.

➤ संविधान वाचन कार्यक्रम

➤ आंतर-आयटीआय संविधान मूल्यांवरील प्रश्नमंजुषा

---

**डिसेंबर – वीर बाल दिन (२६ डिसेंबर)**

१. गुरु गोबिंदसिंह यांच्या चार पुत्रांनी देश आणि धर्माच्या रक्षणासाठी पराक्रमाने आपले प्राण अर्पण केले.

२. धैर्य, निष्ठा व धर्मरक्षणासाठी तरुणांनी प्रेरणा घ्यावी.

➤ ‘5 वीर विद्यार्थी’ यांचा सत्कार

➤ साहिबजाद्यांच्या बलिदानावर नाटिका / सादरीकरण

➤ निबंध स्पर्धा – 'बलिदान म्हणजे काय?'